# हळबे महाविद्यालयाचा वर्धापनदिन साजरा

दोडामार्ग (न. वा.)

शहरात राहून निसर्गाशी नाळ जोडता येत नाही, ती जोडण्यासाठी खेड्यातच राहावं लागत. ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे. हीच गरज ओळखून ग्रामीण भागात शिक्षण संस्थाचालक व शिक्षक खुप कष्टाने हे काम करीत आहेत, असे विचार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी व्यक्त केले.

ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या १५ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. आपल्या मनोगतात ते पुढे म्हणाले की, आई वडीलांच्या उपकारांची जाणीव ठेवा, आपण शिक्षण घेऊन कितीही मोठे झालो तरी गुरुजनांना विसरू नका. जगात प्रत्येकजण गुरू आहे, आपले मित्र आपणास छोट्या छोट्या गोष्टींमधून शिक्षण देत असतात, अशा गुरूंना ओळखता आलं पाहिजे, आपण कितीही मोठे झालो तरी आपल्यापेक्षा जगात दुसरा कोणी तरी मोठा व्यक्ती आहे, याची जाण असावी. यावेळी त्यांनी आपल्या बालपणातील अनेक अनुभव विद्यार्थ्यांना सांगून, त्यांना प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांशी हितगूज करताना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले.

मा. कुलगुरूंच्या हस्ते दीप प्रज्वलन झाल्यानंतर इन्फोकॉम, अमृतवेल, हॉरायझन, नवदर्पण अर्ध वार्षिक वृत्तपत्र, जीवन जगत हा प्रा. प्रशांत ढेपे यांचा हिंदी कवीता संग्रहाचे प्रकाशन व महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षा मार्फत होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये हे होते. प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कुलगुरू यांचा सत्कार संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये यांच्या करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे स्थानिक समितीचे सभासद भाई परमेकर, विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सूचन कोरगांवकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोपान जाधव व आभार श्रीपाद पाडगावकर यांनी मानले.